*For Private Circulation Only*

# Study Circle Career Development Institute

## महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब/क) परीक्षा टेस्ट सेरीज

## पेपर क्रमांक – १ : मराठी व इंग्रजी टेस्ट (१)

## महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब/क) परीक्षा टेस्ट सेरीज

# पेपर क्रमांक – १ : मराठी व इंग्रजी टेस्ट (१)

१) 'सिंह' या शब्दाचा समानार्थी नसलेला शब्द पर्यायी उत्तरांतून शोधा :

१) आदित्य २) केसरी ३) मृगेंद्र ४) वनराज

२) 'आंबट ओला' म्हणजे :

१) चिंचेचे पाणी घालून ओला
२) अर्धवट वाळलेला
३) आंबट वास येणारा ओला
४) ओला चिंब

३) पुढीलपैकी अचूक अर्थ विशद करणारा शब्दसमूह शोधा : बहुश्रुत

१) ज्याने पुष्कळ ऐकले व वाचले आहे असा
२) जो पुष्कळ बोलतो
३) जो पुष्कळ ऐकतो
४) जो काहीही ऐकत आणि वाचत नाही असा

४) पुढील रिकाम्या जागी अचूक पर्याय शोधा :

संस्कृत भाषेतून कसलाही बदल न होता मूळ स्वरूपातच मराठी भाषेत आलेल्या शब्दांना ....... म्हणतात.

१) परकीय शब्द २) अन्य भारतीय शब्द ३) तद्भव ४) तत्सम

५) i) अंजीर, बगीचा हे शब्द फारसी भाषेतील आहेत.
ii) अर्ज, ऊर्फ हे शब्द अरबी भाषेतील आहेत.
iii) पेन, पेन्सिल हे शब्द कानडी भाषेतील आहेत.
iv) भाकरी, तूप हे शब्द इंग्रजी भाषेतील आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

१) विधान नं. (i) चूक आहे
२) विधान नं. (ii) चूक आहे.
३) विधान नं. (i) व (ii) बरोबर आहेत.
४) विधान नं. (iii) व (iv) बरोबर आहेत.

६) 'होकार, प्रतिकार, उपहार, जनता' हे अनुक्रमे कोणत्या प्रकारचे शब्द आहेत? ते ओळखा.

१) उपसर्गघटित, साधित, साधित, सिद्ध
२) साधित, साधित, उपसर्गघटित, प्रत्ययघटित
३) सिद्ध, साधित, उपसर्गघटित, प्रत्ययघटित
४) प्रत्ययघटित, साधित, साधित, उपसर्गघटित

७) पुढील विधाने वाचा.

अ) मूळ शब्दांच्या किंवा धातूंच्या मागे एक किंवा अधिक अक्षरे लागून साधित शब्द बनतात, त्या अक्षरांना उपसर्ग म्हणतात.
ब) उपसर्ग वाक्यात स्वतंत्रपणे वापरता येतात.
क) सरकार, सरदार हे उपसर्गघटित शब्द आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (अ) चूक
२) फक्त (अ) व (ब) बरोबर
३) फक्त (अ) व (क) बरोबर
४) फक्त (ब) व (क) चूक

८) पुढील शब्दांतून प्रत्ययघटित शब्दाचा अचूक पर्याय निवडा :

१) आजन्म २) नालायक ३) पडछाया ४) पूजनीय

९) सयमक –सार्थ – निरर्थ अभ्यस्त शब्द खालीलपैकी कोणता नाही, योग्य पर्याय निवडा.

१) शेजारीपाजारी २) उधारपाधार ३) आंबटचिंबट ४) सोनसाखळी

१०) मराठी शब्द आणि त्याचे मूळ रुप यांच्या जोड्या लावा :

| | |
|---|---|
| अ) आऊत | i) अमंगल |
| ब) इटीदांडू | ii) यष्टीदंड |
| क) ओंगळ | iii) आयुध |
| ड) जुळे | iv) युगुल |

**पर्यायी उत्तरे** :

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| १) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| २) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| ३) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| ४) | (iv) | (ii) | (iii) | (i) |

११) 'मुलगी' या अर्थाने पुढील शब्द वापरत नाहीत.

१) कन्या २) दुहिता ३) तनया ४) रजनी

१२) अचूक अर्थाचे शब्द असलेला गट शोधून लिहा : कुडी –

१) दागिना, शरीर २) देह, मोह ३) पुडी, पुरचुंडी ४) माणिक, मोती

१३) सर्व पत्रव्यवहारात ........... याची संदर्भासाठी दोन्ही बाजूंना आवश्यकता असते.

१) पत्राचा विषय व क्रमांक २) पत्र क्रमांक व दिनांक

३) पत्राचा विषय व दिनांक ४) पत्राचा संदर्भ व क्रमांक

१४) व्याकरणदृष्ट्या योग्य असलेला शब्द ओळखा.

अ) सुटी ब) सुट्टी

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त (अ) बरोबर २) फक्त (ब) बरोबर

३) (अ), (ब) दोन्ही चूक ४) (अ), (ब) दोन्ही बरोबर

१५) मराठी शब्द आणि त्याचे मूळ रूप यांच्या जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| अ) टिकला | i) शलाका |
| ब) ठाण | ii) तिलक |
| क) वाकळ | iii) स्थान |
| ड) सळई | iv) विल्कल |

**पर्यायी उत्तरे** :

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| १) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| २) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| ३) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| ४) | (ii) | (iii) | (iv) | (i) |

१६) पुढील वाक्यातील उद्देश ओळखा – 'भारतीय संघातील खेळाडूंनी चांगली कामगिरी केली.'
१) कामगिरी  २) खेळाडूंनी  ३) भारतीय  ४) चांगली

१७) 'मी चहा पितो. माझ्या वडिलांना हे आवडत नाही' या दोन केवलवाक्यांचे एक केवलवाक्य पुढीलप्रमाणे करता येईल.
१) मी चहा पितो ते वडिलांना आवडत नाही  २) माझे चहा पिणे योग्य नाही
३) माझ्या वडिलांना चहा पिणे आवडत नाही  ४) माझे चहा पिणे माझ्या वडिलांना आवडत नाही

१८) कोणत्या प्रयोगात कर्म नेहमी नपुसकलिंगी एकवचनी व तृतीयपुरुषी असते ?
१) कर्मणी प्रयोग  २) भावे प्रयोग  ३) कर्तरी प्रयोग  ४) कर्ता

१९) पुढील वाक्यात कोणता प्रयोग आहे? ते ओळखा.
अ) त्या घरात आम्ही संसार मांडला.  ब) मुलांनी उत्तम काम केले.
क) शिक्षकांनी कविता छान शिकवली.  ड) त्याने दोन घोडे व एक बैल विकत घेतला.
**पर्यायी उत्तरे** :
१) (अ) आणि (ब) कर्तरी प्रयोग, बाकी भावे प्रयोग  २) (क) आणि (ड) भावे प्रयोग अन्य कर्मकर्तरी प्रयोग
३) (अ), (ब), (क), (ड) हे सर्व कर्मणी प्रयोग  ४) (अ), (ब), (क), (ड) हे सर्व कर्तरी प्रयोग

२०) खालील वाक्याचा पर्यायी उत्तरांतून प्रयोग ओळखा : 'तू मला पुस्तक दिलेस'
१) कर्म – भाव संकर प्रयोग  २) कर्तृ – कर्म संकर प्रयोग
३) कर्तृ – भाव संकर प्रयोग  ४) भावकर्तरी प्रयोग

२१) योग्य पर्याय निवडा :
अ) 'आम्ही जातो आमुच्या गावा' हे केवलवाक्य आहे.
ब) 'जे चकाकते, ते सोने नसते' हे संयुक्तवाक्य आहे.
**पर्यायी उत्तरे** :
१) (अ) चूक  २) (ब) बरोबर  ३) (अ) आणि (ब) चूक  ४) (अ) बरोबर, (ब) चूक

२२) 'त्याने चांगले परिश्रम केले म्हणूनच यश दिसले'. – या वाक्याचा प्रकार ओळखा.
१) संयुक्त वाक्य  २) केवलवाक्य  ३) मिश्रवाक्य  ४) शुद्धवाक्य

२३) 'गुरूजी म्हणाले. पृथ्वी सूर्याभोवती फिरते या वाक्याचे मिश्रवाक्य खालील पर्यायांतून शोधा.

१) गुरूजी म्हणाले, की, पृथ्वी सूर्याभोवती फिरते
२) गुरूजी म्हणाले आणि पृथ्वी सूर्याभोवती फिरली
३) 'पृथ्वी सूर्याभोवती फिरते' असे गुरूजी म्हणाले
४) गुरूजी म्हणाले म्हणून पृथ्वी सूर्याभोवती फिरते

२४) खालीलपैकी संकेतार्थ सुचवणारे वाक्य कोणते ?

१) जर मन लावून अभ्यास केला तर हमखास यश मिळेल.
२) जरा मन लावून अभ्यास कर.
३) रोज मन लावून अभ्यास करावा.
४) रोज मन लावून अभ्यास केला का?

२५) 'जगी सर्वसुखी असा कोण आहे?' हे कोणत्या स्वरूपाचे वाक्य आहे?

१) विधानार्थी
२) उद्गाराअर्थी
३) प्रश्नार्थी
४) होकारार्थी

२६) पुढील उद्‌गारार्थी वाक्याचे विधानार्थी वाक्यात अचूक रुपांतर करा.
केवढी उंच इमारत ही !

१) ही इमारत लहान आहे का
२) ही इमारत उंच आहे
३) ही इमारत खूप उंच आहे
४) ह्या इमारतीची उंचीही काही लहानसहान उंची नव्हे

२७) पुढील विधाने कोणत्या काळातील आहेत ? ती अ, ब, क या क्रमानुसार लावा.
अ) मी अभ्यास करीन. ब) तो मुलगा खेळत आहे. क) मी अभ्यास केला.

**पर्यायी उत्तरे** :

१) भूतकाळ, भविष्यकाळ, अपूर्ण वर्तमानकाळ
२) भविष्यकाळ, भूतकाळ, अपूर्ण वर्तमानकाळ
३) भूतकाळ, अपूर्ण वर्तमानकाळ, भविष्यकाळ
४) भविष्यकाळ, अपूर्ण वर्तमानकाळ, भूतकाळ

२८) खालीलपैकी विरामचिन्हांचा योग्य वापर केलेले वाक्य ओळखा.

१) याज्ञवल्क्य म्हणाले, ''मैत्रेयी, गृहस्थाश्रमाचा त्याग करून मी आता वानप्रस्थाश्रमाची वाटचाल करणार आहे.''
२) याज्ञवल्क्य म्हणाले : मैत्रेयी गृहस्थाश्रमाचा त्याग करून, मी आता वानप्रस्थाश्रमाची वाटचाल करणार आहे !
३) याज्ञवल्क्य म्हणाले मैत्रेयी ! गृहस्थाश्रमाचा त्याग करून मी आता वानप्रस्थाश्रमाची वाटचाल करणार आहे ?
४) याज्ञवल्क्य म्हणाले ''मैत्रेयी गृहस्थाश्रमाचा त्याग करून मी आता; वानप्रस्थाश्रमाची वाटचाल करणार आहे''.

२९) प्, फ् या व्यंजनांचे उच्चारस्थान लिहा.

१) दंत्योष्ठ्य
२) कंठोष्ठ्य
३) ओष्ठ्य
४) दंततालव्य

३०) विशेषनाम म्हणजे :

अ) व्यक्तींना, वास्तूंना ठेवलेली नामे
ब) जी केवळ खुणेसारखी असतात.
क) जी एकत्वसूचक असतात.
ड) ज्यांना अनेकवचन शक्य नसते.

**पर्यायी उत्तरे** :

१) फक्त (अ), (ब) बरोबर
२) (अ), (ब), (क), (ड) सर्व चूक
३) फक्त (क), (ड) बरोबर
४) (अ), (ब), (क), (ड) सर्व चूक

३१) खालील विधानातील सर्वनामाचा प्रकार ओळखा :

**विधान :** तो आपण होऊन माझ्याकडे आला.

१) सामान्य सर्वनाम २) आत्मवाचक सर्वनाम ३) दर्शक सर्वनाम ४) संबंधी सर्वनाम

३२) विसंगत जोडी कोणती ?

a) जो मुलगा व्यायाम करतो तो सशक्त होतो. i) प्रश्नार्थक विशेषण

b) कोण मनुष्य येऊन गेला ? त्याने काय पदार्थ आणले ? ii) संबंधी विशेषण

c) आम्हा मुलांना कोण विचारतो ? iii) सार्वनामिक विशेषण

d) श्रीमंतांना गर्व असतो. iv) दर्शक विशेषण

**पर्यायी उत्तरे :**

१) (a) - (ii) २) (b) - (i) ३) (c) - (iii) ४) (d) - (iv)

३३) काही क्रियापदांचा उपयोग वाक्यात सकर्मक व अकर्मक असा दोन्ही प्रकारे होतो. अशा क्रियापदांना ...... म्हणतात.

१) संयुक्त क्रियापदे २) उभयविध क्रियापदे ३) द्विकर्मक क्रियापदे ४) प्रयोजक क्रियापदे

३४) योग्य क्रम लावा :

a) आता, उद्या, इथे, इकडे i) उभयान्वय अव्यय

b) मागे, पुढे, करिता, साठी ii) क्रियाविशेषण अव्यय

c) आणि, अथवा, परंतु, म्हणून iii) केवलप्रयोगी अव्यय

d) अरेरे, शाब्बास, अबब, ओहो iv) शब्दयोगी अव्यय

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| १) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| २) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| ३) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| ४) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

३५) पुढील पर्याया योग्य की अयोग्य ते सांगा.

अ) जे शब्द, दोन शब्द किंवा दोन वाक्ये यांना जोडतात त्यांना 'उभयान्वयी' असे म्हणतात.

ब) जे शब्द, दोन शब्द किंवा दोन वाक्ये यांना जोडतात त्यांना 'शब्दयोगी' म्हणतात.

**पर्यायी उत्तरे :**

१) (अ) योग्य २) (ब) योग्य ३) (अ) अयोग्य ४) (अ) आणि (ब) अयोग्य

३६) योग्य जोड्या जुळवा.

| **विभक्ती** | **प्रत्यय** |
|---|---|
| a) चतुर्थी | i) त, ई, आ |
| b) तृतीया | ii) ने, ए, शी |
| c) षष्ठी | iii) स, ला, ते |
| d) सप्तमी | iv) चा, ची, चे |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| १) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| २) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| ३) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| ४) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

३७) 'पेन' या इंग्रजीतून मराठीत रूढ झालेल्या शब्दाचे लिंग कोणते?

a) पुल्लिंग b) स्त्रीलिंग c) नपुंसकलिंग d) लिंग निश्चित नाही

**पर्यायी उत्तरे :**

१) (a) व (c) २) (a) व (b) *३) (d)* ४) (c)

३८) वाचन + आलय = वाचनालय

विद्या + अर्जन = विद्यार्जन

ही उदाहरणे कोणत्या संधीची आहेत ?

१) व्यंजन संधी २) स्वर संधी ३) विसर्ग संधी ४) स्वरादी

३९) 'सुसंगति सदा घडो ! सुजन वाक्य कानी पडो !'

या काव्यओळीत कोणत्या अलंकाराचा उपयोग केला आहे ........ ?

१) यमक २) श्लेष ३) अनुप्रास ४) रूपक

४०) रिकाम्या जागी अचूक पर्याय शोधा :

दोन्ही पदे समान दर्जाची असतात त्याला ........ समास म्हणतात.

१) द्वंद्व २) बहुव्रीही ३) कर्मधारय ४) मध्यमपदलोपी

४१) 'कुऱ्हाडीचा घाव खोट्याचे कपाळी' – या म्हणीचा अर्थ काय ?

१) खोटा माणूस कुऱ्हाडीचा घाव बरोबर सोसतो. २) कपटी माणसाला कपटीपणाची शिक्षा मिळते.

३) लाकडाची कुऱ्हाडदांडी ही झाडाशी वैर पत्करते. ४) खोटे कधी वागू बोलू नये.

४२) इरेला पेटणे : या वाक्प्रचाराचा अचूक अर्थ ओळखा.

१) चूल पेटविणे २) चुरस वाटणे ३) जोरात धावणे ४) विस्तव पेटविणे

४३) 'इतर लोक संकटात सापडले म्हणून आपण आनंदून जाऊ नये, आपणही लवकरच त्या संकटाचे बळी ठरणार' – हे सूचित करण्यासाठी कोणत्या म्हणीचा वापर करावा ?

१) त्यांचे संकट आणि आमचा तंटा २) जात्यातील रडती, सुपातील हसती

३) जरी झाला सदाचारी, तरी भिक्षा न मागावी घरोघरी ४) जेवढी करणी तेवढी भरणी

४४) खालील वाक्यातील रिकाम्या जागी वाक्प्रचाराचा योग्य पर्याय शोधा :

कुस्तीवीराने डावपेच लढविताना प्रतिस्पर्ध्याचे –

१) पाणी जोखले २) पाणी पाजले ३) पाणी ओळखले ४) पाण्यात पाहिले

४५) पुढील वाक्य अचूक पर्याय शोधून पूर्ण करा : आमचा घरगडी नेहमीच ......

१) अंग चोरून काम करतो
२) खिडकीतून पळून जातो
३) कांदेपोहे खातो
४) प्रेतयात्रेला जातो

**खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्न क्रमांक ४६ ते ५० ची उत्तरे लिहा :**

देवाच्या दारात सारे सारखेच, असं आपण म्हणतो, पण देवळाच्या दारात मात्र साऱ्यांना समान वागणूक मिळत नाही, असा अनुभव आजही येतो. भारतातील हिंदू देवालयांमधून सगळ्यांना प्रवेश खुला करणारा कायदा अस्तित्वात असला तरी त्याची बूज न राखता व्यवहार होत आहेत, असंही बऱ्याचदा आढळतं. केवळ ठरावीक जातींनाच नव्हे, तर स्त्रियांनाही विशिष्ट देवांच्या देवळांमधून प्रवेश न देण्याची परंपरा आपल्याकडे शतकांपासून आहे.

अलीकडे मात्र अशा तऱ्हेच्या बंधनांना झुगारलं पाहिजे असा विचार पुढे येऊ लागला आहे. महाराष्ट्रात स्त्रियांना प्रवेश निषिद्ध असलेली देवळं म्हणजे एक कार्तिकेयाचं, आणि दुसरे शनी शिंगणापूर. शनी शिंगणापूर येथील शनीच्या देवळाच्या चौथऱ्यावरून स्त्रियांना शनिदेवाचे दर्शन घेण्यास मज्जाव आहे. त्याविरुद्ध स्त्री संघटनांनी आंदोलनही केलं होतं. कारण असा भेदभाव करणं घटनेतील समानतेच्या तत्त्वाविरुद्ध आहे अशी त्यांची भूमिका होती. दुसरे उदाहरण आळंदीचे. स्त्रियांना तिथल्या अजानवृक्षाखाली बसून ज्ञानेश्वरी वाचण्यास मनाई आहे. आळंदीला अखिल भारतीय साहित्य संमेलन झालं त्यावेळी आंदोलन करून ही परवानगी मिळवावी लागली.

कार्तिकेयाच्या देवळात स्त्रीवर्गाने न जाण्याची प्रथा फार पूर्वीपासून आहे. लहान मुलींनाही तिथे प्रवेश दिला जात नाही. दक्षिणेत मात्र तसं नाही. तिथे कार्तिकेयाच्या मंदिरात महिला जात असतात. मात्र अय्यप्पाच्या देवळात स्त्रियांना प्रवेश बंदी आहे.

या देवतेची विशिष्ट आख्यायिका आहे. अय्यप्पा हा भस्मासुराचा वध करण्यासाठी घेतलेले विष्णूचं मोहिनीरूप आणि शिव यांच्या संयोगातून जन्मला आहे अशी कथा आहे. दरवर्षी संक्रांतीच्या काळात मकर ज्योतीचं दर्शन घेण्यासाठी केरळातील शबरीमलय इथे असलेल्या अय्यप्पाच्या सुप्रसिद्ध मंदिराची यात्रा असते. या यात्रेच्या बराच काळ आधीपासून पुरुष मंडळी अय्यप्पाचं व्रत अंगीकारतात आणि शबरीमलय यात्रा करून ते समाप्त करतात. ब्रह्मचर्याचं पालन या काळात करावं लागतं म्हणून शक्यतो स्त्रीचं दर्शनही नको अशी यामागची एक भूमिका आहे.

नव्या आणि बदलत्या वातावरणात तसंच भारतीय घटनेनेही समानतेचं तत्त्व मान्य केलं असल्याने स्त्रिया आणि पुरुष यांच्यात असा भेदभाव करणं योग्य नाही अशी भूमिका घेऊन मंदिर प्रवेशाचा आग्रह धरणारे आहेत. केरळातील राज्य सरकारचाही स्त्रियांना मंदिर प्रवेश देण्यास पाठिंबा आहे.

मुळात मंदिरात विशिष्ट गटाला प्रवेश नाकारण्यामागे काय हेतू असू शकतो, हा विचार केला पाहिजे. मंदिरात येणारा कोणीही देवतेचा अवमान करण्यासाठी नक्कीच येत नाही, तरीही त्यास तिथे येऊ दिलं जात नसेल, तर ते नक्कीच आक्षेपार्ह आहे. तसंच विशिष्ट जात, धर्म किंवा स्त्री असणं हे मंदिर प्रवेश नाकारण्याचं कारण होऊ शकत नाही. त्यामुळे उलट राज्यघटनेची बेअदबी होते. दुसऱ्यावर श्रेष्ठत्वाचा अधिकार गाजवण्याची जी प्रवृत्ती माणसात असते त्याचाच आविष्कार अशा तऱ्हेच्या बंदीत स्पष्टपणे दिसतो. हजारो वर्षांपासून स्त्रिया आणि दलित यांना भेदभावाची वागणूक दिली गेली. आपण पुरुष आहोत एवढेच एक कारण आपण श्रेष्ठ असण्यासाठी पुरेसे आहे असं एका मोठ्या पुरुष वर्गाला वाटत आलं आहे. त्याची परिणती आपण संपूर्ण समाज पुरुष प्रधान बनण्यात होताना अनुभवलं आहे आणि अनुभवत असतो. शबरीमलय किंवा शनी शिंगणापूरसारखी आणखीही उदाहरणं असतील. अशा प्रकरणात पुरुष सत्ता आणि धर्म सत्ता हातात हात घालून येत असल्यामुळे दिसून येणारा प्रभाव हा बराच टिकून राहणार हे उघड आहे. म्हणून परंपरा कितीही अन्यायकारक असल्या तरी त्यांच्याविरुद्ध बोलण्यास फार कुणी पुढे येत नाही. धार्मिक दहशत मनांवर राज्य करत असते या गोष्टीचा मग फायदा उठवला जातो. एक तऱ्हेची हुकूमशाही यातून प्रस्थापित होत जाते. विशेषतः दक्षिणेकडील अनेक मंदिरांमधून असणारी खास प्रकारच्या पोशाखाची सक्ती ही सुद्धा यामुळेच अस्तित्वात आली आहे.

४६) आजही देवाच्या दारात ......

१) फक्त स्त्रियांनाच प्रवेश मिळतो
२) साऱ्यांना समान वागणूक मिळत नाही
३) फक्त दलितांनाच प्रवेश नाकारला जातो
४) कुमारिका व वृद्ध स्त्रिया यांनाच प्रवेश मिळतो

४७) स्त्रियांना प्रवेश निषिद्ध असलेली महाराष्ट्राची मंदिरे ......
१) कार्तिकेय आणि शनी शिंगणापूर २) आळंदीचे ज्ञानेश्वर मंदिर
३) कार्तिकेय आणि अय्यप्पा यांची मंदिरे ४) सर्व मंदिरे

४८) अय्यप्पाच्या देवळात स्त्रियांना बंदी असण्याचे कारण ......
१) मोहिनी आणि शिव यांच्या संयोगातून अय्यप्पाचा जन्म
२) केरळातील शबरीमलय येथे दरवर्षी भरणारी यात्रा
३) पुजाऱ्यांच्या धार्मिक दडपणामुळे
४) व्रतकाळात ब्रह्मचर्याचे पालन होण्यासाठी स्त्रीदर्शन नको

४९) भारतीय घटनेने कोणते समानतेचे तत्त्व मान्य केले?
१) फक्त स्त्रियांनाच मंदिरात प्रवेश मिळावा
२) स्त्रिया आणि पुरुष यांच्यात भेदभाव करणे योग्य नाही
३) कार्तिकेय आणि शनी शिंगणापूर मंदिरात स्त्रियांनाही प्रवेश मिळावा
४) कोणत्याही जाती-धर्मातील स्त्री-पुरुषांना मंदिरात प्रवेश देऊ नये

५०) मंदिरात विशिष्ट गटाला प्रवेश नाकारण्यामागे असणारा हेतू ......
१) विशिष्ट गट हे शक्तीने कमकुवत असतात
२) दुसऱ्यावर श्रेष्ठत्वाचा अधिकार गाजविण्याची प्रवृत्ती
३) पुरुष अधिक पवित्र आहेत - अशी समजूत
४) स्त्रिया अपवित्र असतात अशी मानसिकता

Study CIRCLE

51) Substitute the underlined word with a suitable synonym from the options given below :
He stood in the <u>vestibule</u> of the hotel.
1) pantry 2) lobby 3) kitchen 4) basement

52) He has a passion for <u>indigenous</u> goods.
Select the alternative which is closest to the opposite in meaning of the underlined word.
1) Native 2) Foreign 3) Cheap 4) Simple

53) Match the pairs :

| (I) | (II) |
|---|---|
| a) A squirrel's home | i) Archives |
| b) A residence of nuns | ii) Monastery |
| c) A residence for monks | iii) Dery |
| d) A place where government records are kept | iv) Convent |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| 1) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| 2) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| 3) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| 4) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

54) Some of the discoveries of modern science are simply marvellous.
Identify the correct meaning of the underlined word.
1) praiseworthy 2) commendable
3) admirable 4) amazing

55) Identify the alternative in which the words are spelt correctly ?
1) dominent, difference, discipline, entrance
2) dominant, difference, discipline, entrance
3) dominant, difference, descipline, entrence
4) dominant, differance decipline, entrence

56) Which of the following is / are not included in rodents?
a) Rabbits b) Cats c) Mice
**Answer Options :**
1) a and b only 2) b only 3) c only 4) a, b and c

57) Select proper cohesive devices for given blanks.
Several reasons can be given for the change in the attitude of many students.
...(a)........ , they fear the out break of nuclear war. ...(b)....... , they are concerned over the mounting pollution, of the environment. Not enough progress, ...(c)...... has been made in reducing poverty or racial strife. And . (d)....... , feel frustrated in their attempts to influence political decisions.
i) Secondly ii) to begin with iii) to conclude iv) moreover
**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| 1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| 2) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| 3) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| 4) | (i) | (iv) | (iii) | (ii) |

58) Fill in the blank in the following sentence with the word in brackets with appropriate prefix.
"This is not an ...... (curable) discase," said the doctor.
1) incurable 2) uncurable 3) recurable 4) undercurable

59) Choose the pair of words that would most appropriately fill in the blanks in the following sentences sequentially :
I) His ......... manner annoyed her.
II) They denied that there was any ........ connection between unemployment and crime.
**Answer options :**
1) causal, casual 2) causal, casually
3) casual, causal 4) causally, casually

60) Fill in the blank with the correct word from the choices give below :
That you cannot hear ........... .
1) inherable 2) inlistenable 3) inaudible 4) incapable

61) Choose the correct complex sentence corresponding to the given sentence.
You pull out the plug and I' II scream.
1) I'll scream because you pull out the plug.
2) If you pull out the plug, I'll scream.
3) Because you will pull out the plug, I'll scream.
4) Since you will pull out the plug, I' ll scream.

62) She is charming girl.
Choose the correct form of exclamatory sentence from the options given.
1) She is charming girl! 2) Wow! charming girl.
3) What a charming girl she is ! 4) What! is she a charming girl.

63) He was so fond of amusement that he could not become a prosperous man.
Identify the type of clause in the above sentence.
1) Adjective clause 2) Adverb clause of purpose
3) Adverb clasue of effect 4) Noun clause

64) Add a Question Tag.
You have tea for breakfast,........
1) have you? 2) haven't you?
3) don't you? 4) do you?

65) Find out the correct sentence/s :
a) I have lost a ten-rupees note. b) I have lost a ten-rupee note.
c) I do not like these kinds of games. d) I do not like this kind of games.
**Answer options :**
1) Both (a) and (c) 2) Both (a) and (d) 3) Only (b) 4) Only (d)

66) <u>You have taken</u> / <u>many troubles</u> / <u>for me</u> / <u>No error.</u>
(P) (Q) (R) (S)
Spot the error in above sentence.
If there is no error say No error.
1) Only (P) 2) Only (Q) 3) Only (R) 4) No error - (S)

67) a) Shakespeare says : Do wrong to none.
b) Tennyson says, "Knoweldge comes, but wisdom lingers."
c) O, dear ! come to me like lightening.
Identify the sentence/s punctuated incorrectly.
1) Only (a) 2) Only (a) and (c) 3) Only (b) 4) Only (c)

68) Put the sentence in Indirect speech.
He said, "Bravo ! you have done well."
1) He applauded him, saying that he had done well.
2) He exclaimed and said you have done well.
3) He said bravo and did well.
4) He said to him brave to have done well.

69) Choose the correct passive form of the given sentence.
One should keep one's promises.
1) One's promises should be keeping.
2) promises should be kept.
3) Promises be kept.
4) No promises should be broken.

70) No other man was so strong as Hercules. Which one of the following changes the above sentence into superlative degree?
1) Hercules was the strongest man.
2) Hercules was the strongest of all men
3) Hercules was the most strong of all man
4) Hercules was the strongest of men.

71) He is so clever that he cannot be easily deceived. Use 'too' and rewrite.
1) He is too clever so he cannot be deceived.
2) He is too clever to be deceived easily.
3) He is clever too, that he cannot be easily deceived.
4) He too is clever to be easily deceived.

72) I told him <u>that he had failed.</u>
The underlined clause in the above sentence is an example of ?
1) adjective clause
2) noun clause
3) adverb clasue
4) verb clause

73) Which of the following sentences is grammatically **correct** ?
1) I asked him where does he work ?
2) He has arrived here, isn't it ?
3) He died from cholera.
4) I'm a teacher, aren't I ?

74) Which of the following sentences is/are not correct?
a) That pair of scissors belong to me.
b) The furniture are to be delivered today.
c) A pair of shoes were standing in the corner.
**Answer options :**
1) (a) Only
2) (a) and (b) only
3) (a) and (c) only
4) (a), (b) and (c)

75) Make the following sentence into plural form.
There is no lady teacher in our college.
1) There is no lady teacher in our college.
2) There are no lady teachers in our college.
3) There are no ladies teachers in our college.
4) There is no ladies teachers in our college.

76) Name the type of sentence.
Considering that the world is so intricate, we are not to be surprised that science has progress slowly.
1) Simple sentence
2) Compound sentence
3) Simple-complex sentence
4) Complex sentence

77) Tell me <u>where you live?</u>
Select the sentence in which correct word is used for the underlined clause.
a) Tell me your living.
b) Tell me your address
**Answer options :**
1) Only (a) 2) Only (b) 3) Both 4) Neither

78) Choose the incorrect sentences :
a) If I have time, I shall visit the exhibition.
b) If there was rush of orders, we have to work overtime.
c) We could have started dinner if only John has been there.
**Answer Option :**
1) (a) and (b) only 2) (b) and (c) only 3) (a) and (c) only 4) (a),(b) and (c)

79) Sonali said, 'I must go home."
Choose the correct indirect narration of the sentence.
a) Sonali said that she had to go home.
b) Sonali said that she must go home.
**Answer options :**
1) Only (a) 2) Only (b) 3) Both 4) Neither

80) Identify the correct sentence/s in passive voice.
a) Accidents are caused by carelessness.
b) Our clothes were not spoilt.
c) I want coffee to have.
**Answer Option :**
1) (a) and (c) only 2) Only (b) and (c) 3) Only (c) 4) Only (a) and (b)

81) 'The flower loses freshness and scent when plucked.'
State which type of noun is the word 'freshness'.
1) common noun 2) abstract noun
3) collective noun 4) proper noun

82) 'I have often seen falling stars.' Identify the word 'falling.'
Choose the option.
1) Present Participle 2) Past Participle
3) Participial Adjective 4) None

83) Choose the correct modal auxiliary.
I've lost my ring. I ....... it in the park.
1) must have dropped 2) can drop
3) have to drop 4) need to drop

84) 'I can hear him singing a song.'
Identify the word 'singing'. Say whether it is :
1) Gerund
2) Adverb
3) Present participle
4) Participial Adjective

85) 'Round' ...... is used as an adverb in which of the following sentences?
1) A square peg in a round hole
2) The evening was a round of pleasures
3) We shall round the cape in safety
4) He came round to their belief

86) Insert the appropriate co-ordinating conjunction in the blank space.
Hear the opinions of other men, ....... form your own judgement.
1) and
2) so
3) because
4) but

87) Identify the correct verb form.
Has the bell .................?
1) ring
2) ringed
3) rung
4) rings

88) Fill in the blanks with correct articles.
a) ......... book you want is out of print.
b) This is ....... best book of elementary chemistry.
**Answers Options :**
1) A, the
2) The, a
3) The, the
4) A, a

89) Which of the following words is feminine?
१) Tom cat
२) Sultan
३) Jackass
४) Bride

90) Travel <u>light</u> if you muse.
Identify the part of speech of the word underlined.
1) Noun
2) Verb
3) Adjective
4) Adverb

91) Which of the following are correctly explained?
a) Call a spade a spade - to tell a plain lie
b) The clarion call - call of duty
c) Achilles' heel - small but important weakness
**Answers Options :**
1) a and b only
2) b and c only
3) a and c only
4) a, b and c

92) Select the correct meninng od the proverb ...'Blood is thicker than water'
1) Blood as a liquid is thicker than water.
2) Blood relation is superior to other relations.
3) Acheived relationships are better than blood relationships.
4) Sometimes blood is like water.

93) What is the English meaning of the phrase "entering the stomach"?
1) To yearn
2) To creep into one's favour
3) To pinch the belly
4) To take away one's livelihood

94) "There is no success without hard work, honesty is the best strategy". Which alternative phrase in English would you choose for, "Honesty is the best strategy" in this sentence?
1) Slow and steady wins the race
2) Honesty is the best policy
3) Well begun is half done
4) Work is worship

95) Which of the following expression are correct?
a) Turn in one's grave.
b) Fill one's own grave
c) Have one foot in the grave
**Answer options :**
1) (a) and (b) only
2) (b) and (c) only
3) (b) and (c) only
4) (a), (b), and (c)

**Read the following passage carefully and answer the following questions 96 to 100 on it.**

It was approaching midnight on that Saturday. A full inventory of the firm's merchandise was being prepared. *Mota Sheth* was seething with concealed rage.

He had learnt upon his return from a trip to their village that, in his absence, *Nana Sheth* had instituted a weekly Sunday holiday for all employees. In private, Mota Sheth had thoroughly chewed his younger brother out, but the two brothers valued the firm's prestige too much to air their differences publicity. The biggest tragedy of the situation was not only that the Sunday holiday grant had been made in writing, but that Nana Sheth had also given his blessings for the creation of an employee's Social Club. Mota Sheth knew better than to abruptly rescind those concessions. He was waiting for an opportune moment when the employees themselves would volunteer to give up the Sundays and ask to return to the one-day-a-month New Moon holiday Mota Sheth genuinely believed that the free time on Sundays didn't do anything good for the employees, but actually caused harm. They tended to go out with their families and waste good money that they should be saving. He also knew from his own experience that it was difficult to concentrate at work on Mondays after being idle for a whole day. But the staff had to come to this realisation themselves. The prolonged Saturday night assignments were aimed at securing this result.

96) The biggest tragedy of the situation was that.
1) Nana Sheth had also given his blessings for the creation of an employees social club.
2) Nana Sheth ran away with the money.
3) Nana Sheth threatened him to take the entire estate.
4) Nana Sheth quarreled with employees.

97) The theme of he passage.
1) A dispute between two brothers.
2) The difference of opinion of the master and employees
3) Success story of a business
4) Relationship between owner and employees.

98) The two brothers. Mota Sheth and Nana Sheth valued :
1) The employees 2) The firm prestige 3) Money 4) Work

99) Mota Sheth was seething with rage, because :
1) Nana Sheth had not paid attention to the firm.
2) In his absence Nana Sheth had instituted a weekly Sunday holiday for all employees.
3) Nana Sheth had gone abroad
4) All his employees were on strike.

100) Mota Sheth knew from his experience that.
1) The employees do not respect him.
2) It is difficult to flourish the firm once again.
3) Now he can't adjust with Nana Sheth as his partner.
4) It was difficult to concentrate at work on Monday after being idle for a whole day.

Study CIRCLE

*For Private Circulation Only*

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब/ क) परीक्षा टेस्ट सेरीज

# पेपर क्रमांक – १ : मराठी व इंग्रजी टेस्ट (१)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १–१ | २–२ | ३–१ | ४–४ | ५–३ | ६–२ | ७–३ | ८–४ | ९–४ | १०–२ |
| ११–४ | १२–१ | १३–२ | १४–४ | १५–४ | १६–२ | १७–४ | १८–२ | १९–३ | २०–२ |
| २१–४ | २२–१ | २३–१ | २४–१ | २५–३ | २६–३ | २७–४ | २८–१ | २९–३ | ३०–४ |
| ३१–२ | ३२–४ | ३३–२ | ३४–२ | ३५–१ | ३६–१ | ३७–१ | ३८–२ | ३९–१ | ४०–१ |
| ४१–२ | ४२–२ | ४३–२ | ४४–१ | ४५–१ | ४६–२ | ४७–१ | ४८–४ | ४९–२ | ५०–२ |
| ५१–२ | ५२–२ | ५३–३ | ५४–४ | ५५–२ | ५६–२ | ५७–३ | ५८–१ | ५९–३ | ६०–३ |
| ६१–२ | ६२–३ | ६३–३ | ६४–३ | ६५–२ | ६६–२ | ६७–४ | ६८–१ | ६९–२ | ७०–२ |
| ७१–२ | ७२–२ | ७३–४ | ७४–४ | ७५–२ | ७६–४ | ७७–२ | ७८–२ | ७९–१ | ८०–४ |
| ८१–२ | ८२–३ | ८३–१ | ८४–३ | ८५–४ | ८६–४ | ८७–३ | ८८–३ | ८९–४ | ९०–४ |
| ९१–२ | ९२–x | ९३–२ | ९४–२ | ९५–३ | ९६–१ | ९७–१ | ९८–२ | ९९–२ | १००–४ |

# महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब)/(गट क)

## पेपर क्रमांक – १ : मराठी व इंग्रजी

### १) मराठी भाषा (५०)

(१) सर्वसामान्य शब्दसंग्रह /१५
(२) वाक्यरचना/१३
(३) व्याकरण/१२
(४) म्हणी व वाक्प्रचार (अर्थ व उपयोग)/५
(५) उताऱ्यावरील प्रश्नोत्तरे/५

### (२) इंग्रजी भाषा /५०

**(6) CommonVocabualry / 10**
**(7) SentenceStructure / 20**
**(8) Grammar /10**
**(9) Use of Idioms and Phrases / 5**
**(10) Comprehension / 5**

## पेपर क्रमांक – २ : सामान्य अध्ययन व बुद्धिमापन चाचणी

१) सामान्य बुद्धिमापन व आकलन /१०
२) चालू घडामोडी – जागतिक तसेच महाराष्ट्रासह भारतातील /१०
३) अंकगणित आणि सांख्यिकी /१०
४) अ) माहिती अधिकार अधिनियम, २००५ /५
ब) महाराष्ट्र लोकसेवा हक्क, २०१५ /५
५) भारतीय संघराज्य व्यवस्था, राज्यघटना, स्थानिक स्वराज्य व्यवस्था, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ, विधीमंडळ/१५
६) अ) भारताचा व महाराष्ट्राचा भूगोल /१०
ब) पर्यावरण /५
७) सामान्य विज्ञान व तंत्रज्ञान /१५ –
अ) भौतिकशास्त्र (फिजिक्स) /२
ब) रसायनशास्त्र (केमिस्ट्री) /२
क) प्राणीशास्त्र (झूलॉजी) /२
ड) वनस्पतिशास्त्र (बॉटनी) /२
इ) दूरसंवेदन, हवाई व ड्रोन छायाचित्रण, भौगोलिक माहिती प्रणाली व त्याचे उपयोजन /२
फ) माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान /५
८) अर्थव्यवस्था व नियोजन, विकास विषयक अर्थशास्त्र आणि कृषी /१५
१) समग्रलक्षी अर्थशास्त्र, विकास विषयक अर्थशास्त्र /६
२) भारतीय अर्थव्यवस्था आणि कृषी /९

# महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब)
# Maharashtra Non Gazzeted Services Main Examination (Group B)

## -: परीक्षा योजना :-

**प्रश्नपत्रिकांची संख्या - दोन**

**पेपर क्र.-१ - २०० गुण**
**पेपर क्र.-२ - २०० गुण**
**एकूण - ४०० गुण**

**शारीरिक चाचणी व मुलाखत - केवळ पोलीस उप निरीक्षक पदाकरीता**
**(शारीरिक चाचणी - १०० गुण, मुलाखत - ४० गुण)**

| पेपर क्र. व संकेतांक | विषय | प्रश्नसंख्या | गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ (सांकेतांक १०६२) | मराठी | ५० | १०० | बारावी | मराठी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | ५० | १०० | पदवी | इंग्रजी | | |
| २ (सांकेतांक १०६३) | सामान्य अध्ययन व बुद्धिमत्ता चाचणी | १०० | २०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**नकारात्मक गुणदान -**

| |
|---|
| १) प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/ कमी करण्यात येतील. |
| २) एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अथवा ज्या उमेदवाराने उत्तरपत्रिकेत पूर्ण वर्तुळ चिन्हांकित केले नसेल अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील. |
| ३) वरीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच राहील व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल. |
| ४) एखाद्या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरितअसेल तर, अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही. |

## -: अभ्यासक्रम :-

**पेपर क्रमांक - १ - मराठी, इंग्रजी या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.**

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १ | **मराठी :-** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे |
| २ | **इंग्रजी : -** Common Vocabulary, Sentence structure, Grammar, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage. |

# महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट क)
## (सहायक मोटार वाहन निरीक्षक पद वगळून अन्य पदांकरीता)
# Maharashtra Non Gazzeted Services Main Examination (Group C)
## (All posts excluding Assistant Motor Vehicle Inspector Post)

## -: परीक्षा योजना :-

**प्रश्नपत्रिकांची संख्या - दोन**

**पेपर क्र.-१ - २०० गुण**
**पेपर क्र.-२ - २०० गुण**
**एकूण - ४०० गुण**

| पेपर क्र. व संकेतांक | विषय | प्रश्नसंख्या | गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ (सांकेतांक १०६४) | मराठी | ५० | १०० | बारावी | मराठी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | ५० | १०० | पदवी | इंग्रजी | | |
| २ (सांकेतांक १०६५) | सामान्य अध्ययन व बुद्धिमत्ता चाचणी | १०० | २०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**नकारात्मक गुणदान -**

| |
|---|
| १) प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/ कमी करण्यात येतील. |
| २) एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अथवा ज्या उमेदवाराने उत्तरपत्रिकेत पूर्ण वर्तुळ चिन्हांकित केले नसेल अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील. |
| ३) वरीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच राहील व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल. |
| ४) एखाद्या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरितअसेल तर, अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही. |

## -: अभ्यासक्रम :-

**पेपर क्रमांक - १ - मराठी, इंग्रजी या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.**

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १ | **मराठी :-** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे |
| २ | **इंग्रजी : -** Common Vocabulary, Sentence structure, Grammar, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage. |

## महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब)/(गट क) २०२३

# पेपर क्रमांक – १ : मराठी व इंग्रजी सविस्तर अभ्यासक्रम

**(१) सर्वसामान्य शब्दसंग्रह /१५**
**(२) वाक्यरचना/१३**
**(३) व्याकरण/१२**
**(४) म्हणी व वाक्प्रचार (अर्थ व उपयोग)/५**
**(५) उताऱ्यावरील प्रश्नोत्तरे/५**

## १) मराठी (५०)

### (१) सर्वसामान्य शब्दसंग्रह /१५

१) समानार्थी शब्द–विरुद्धार्थी शब्द
२) शब्दार्थ–संज्ञांचे अर्थ
३) शब्दसमूहाबद्दल एक शब्द
४) शब्दव्युत्पत्ती – तत्सम / तद्भव
५) देशी / भारतीय / परभाषेतील शब्द
६) शब्दसिद्धी – सिद्ध शब्द / धातू
७) उपसर्गघटित शब्द
८) प्रत्ययसाधित शब्द – कृदंत – धातू साधित / तद्धित – शब्द साधित
९) अभ्यस्त शब्द – पूर्णाभ्यस्त / अंशाभ्यस्त / अनुकरण वाचक
१०) अलंकारिक / सामासिक / ग्रामीण व नागरी शब्द
११) शब्दार्थ न जुळणारा शब्द, पर्यायी शब्द / पर्यायी नसलेला शब्द
१२) विविधअर्थी एक शब्द
१३) संदर्भ शब्द रिकाम्या जागी निवडणे
१४) शब्दांचे शुद्धलेखन – शब्दाचा प्रकार, जोडशब्द
१५) लिपी, शब्दशक्ती/शब्दांचे काव्यगुण

### (२) वाक्यरचना/१३

१) वाक्याचे पृथक्करण –उद्देश व उद्देशविस्तार, विधेय व विधेयविस्तार
२) वाक्य संश्लेषण व वाक्यनिर्मिती
३) वाक्यातील कर्ता व कर्म
४) कर्तरी प्रयोग, कर्मणी प्रयोग
५) भावे प्रयोग, नवीन प्रकार

**✲ वाक्यरचनेनुसार प्रकार व रूपांतर**

६) केवलवाक्य, मुख्य आणि गौण वाक्ये
७) संयुक्तवाक्य व वाक्य रूपांतर
८) मिश्रवाक्य व वाक्य रूपांतर

**✻ अर्थावरून प्रकार व वाक्य रूपांतर**

९) होकारार्थी, नकारार्थी व वाक्य रूपांतर

१०) प्रश्नार्थक व वाक्य रूपांतर

११) उद्‌गारवाचक, आज्ञार्थी व वाक्य रूपांतर

१२) वाक्यातील काळ आणि आख्यात

१३) योग्य विरामचिन्हांचा वापर

## (३) व्याकरण/१२

१) वर्णाक्षरे व शब्दांच्या जाती
  १) वर्णाक्षर व मूलध्वनी
  २) स्वर
  ३) व्यंजन
  ४) अनुनासिके
  ५) वर्णरचना
  ६) जोडाक्षर
  ७) शब्दांच्या जाती

२) नाम व नामाचे प्रकार

३) सर्वनाम

४) विशेषण

५) क्रियापदांचे प्रकार, रूप व धातुसाधिते

६) क्रियाविशेषण व शब्दयोगी अव्यय

७) उभयान्वयी व केवलप्रयोगी अव्यय

८) सामान्यरूप व विभक्ती

९) लिंग व वचन

१०) संधी व समास

११) अलंकार, वृत्ते, पद्यरचना – काव्य/ओव्या

१२) वाङ्मयीन इतिहास व भाषिक सामान्यज्ञान

## (४) म्हणी व वाक्प्रचार (अर्थ व उपयोग)/५

४१) म्हणीचा योग्य अर्थ

४२) वाक्प्रचाराचा योग्य अर्थ

४३) योग्य अर्थाची म्हण/पर्यायी म्हण निवडणे

४४) पर्यायी वाक्प्रचार

४५) म्हणीचा/वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग

Study CIRCLE

## (५) उताऱ्यावरील प्रश्नोत्तरे/५

४६) उतारा क्र.१ प्रश्न क्र.१

४७) उतारा क्र.१ प्रश्न क्र.२

४८) उतारा क्र.१ प्रश्न क्र.३

४९) उतारा क्र.१ प्रश्न क्र.४

५०) उतारा क्र.१ प्रश्न क्र.५

# (२) इंग्रजी /५०

## (6) CommonVocabualry /10

51) Synonyms / Homonym
52) Antonyms
53) One Word substitution
54) Meaning / Wrong meaning of words, underlined words
55) Correct spelling
56) Names for groups/collection
57) Use of correct word
58) Word formation /Construction / building
59) Confusing words & Full form
60) Fill in the blanks

## (7) SentenceStructure /20

61) Types of sentences - structure
62) Types of sentences - meaning
63) Types of clauses
64) Question tags and Interrogative sentences
65) Grammatically Correct sentence
66) Grammatical error part
67) Punctuation
68) Direct - Indirect Speech
69) Active & Passive Voice
70) Degrees
71) Transformation
72) Completion of clauses
73) Meaning of sentence
74) Sentence completion
75) Sentence construction
76) Types of sentences - structure/meaning
77) Types of clauses
78) Grammatically Correct /error part/Punctuation
79) Direct - Indirect Speech
80) Active & Passive Voice

## (8) Grammar /10

81) Types and use of Noun, Pronouns
82) Types and use of correct Adjectives
83) Types and use of Verbs, Modals
84) Types of Tenses
85) Use of correct Adverb
86) Use of correct Preposition
87) Use of correct Conjunction and Interjection
88) Use of Articles
89) Singular & Plural, Gender
90) Figure of Speech

## (9) Use of Idioms and Phrases / 5

91) Correct meaning of a phrase
92) Correct meaning of an idiom
93) Correct use of phrase
94) Correct use of an idiom
95) Gerundial phrase, Substitution of phrase / idiom

## (10) Comprehension / 5

96) Passage no.2, Q.no.1
97) Passage no.2, Q.no.2
98) Passage no.2, Q.no.3
99) Passage no.2, Q.no.4
100) Passage no.2, Q.no.5

study CIRCLE